जा.क्र.जिपना/आरोग्य/अधिक्षक/1611/२०२६
कार्यालय आरोग्य विभाग जिल्हा परिषद नांदेड
दिनांक - 6 MAR 2026

प्रति,
मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा),
जिल्हा परिषद नांदेड .

विषय :- नागरीकाची सनद सादर करीत असले बाबत.

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सन -२०२६ ची नागरीकाची सनद या सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे. करीता माहितीस्त सविनय सादर

सोबत :- नागरीकाची सनद

(डॉ.संगिता देशमुख)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड

# नागरीकाची सनद

## आरोग्य विभाग जिल्हा परिषद नांदेड

### आरोग्य विभाग जिल्हा परिषद नांदेड च्या कार्यकक्षेत असलेल्या खालील आरोग्य संस्थामार्फत नागरीकांना वैद्यकिय सुविधा देण्यात येतात

### आरोग्य विभागाअंतर्गत पुढील प्रमाणे आरोग्य संस्था कार्यान्वीत आहेत.

| अनु क्रमांक | आरोग्य संस्थेचे नाव | एकुण आरोग्य संस्था |
|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्र | ७० |
| २ | नागरी दवाखाने | ०७ |
| ३ | प्राथमिक आरोग्य पथक | ११ |
| ४ | फिरते आरोग्य पथक | ०५ |
| ५ | आयुर्वेदीक दवाखाने | ०७ |
| ६ | उप केंद्र | ३७७ |
| ७ | युनानी दवाखाने | ७ |

खालील प्रमाणे कार्यरत असलेल्या आरोग्य संस्थेत खालील प्रमाणे मनुष्यबळ मंजुर आहे

| अनु क्रमांक | संवर्गाचे नाव | मंजुर पदे |
|---|---|---|
| १ | जिल्हा आरोग्य अधिकारी | १ |
| २ | अति.जिल्हा आरोग्य अधिकारी | १ |
| ३ | सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी | १ |
| ४ | जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी | १ |
| ५ | जिल्हा सांख्यीकी अधिकारी | १ |
| ६ | जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी | १ |
| ७ | तालुका आरोग्य अधिकारी | १६ |
| ८ | वैद्यकियअधिकारी | १८३ |
| ९ | प्रशासकिय अधिकारी | १ |
| १० | विस्तार अधिकारी आरोग्य | ३४ |
| ११ | कुष्ठरोग तंत्रज्ञ | ७ |
| १२ | आरोग्य सहाय्यक | १३४ |
| १३ | आरोग्य सहाय्यीका | ७७ |
| १४ | आरोग्य सेवक | ४११ |
| १५ | आरोग्य सेविका | ६२६ |
| १६ | औषध निर्माण अधिकारी | ९९ |
| १७ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १६ |
| १८ | कक्ष अधिकारी | १ |
| १९ | अधिक्षक | ३ |
| २० | लघुलेखक (निम्न श्रेणी) | १ |
| २१ | विस्तार अधिकरी (सां) | १ |
| २२ | सहाय्यक लेखा अधिकारी | १ |
| २३ | कनिष्टलेखा अधिकारी | १ |
| २४ | शित सांखळी तंत्रज्ञ | १ |
| २५ | सांख्यिकी पर्यवेक्षक | १ |

२. राष्ट्रीय कुटूंब कल्याण कार्यक्रम

राष्ट्रीय कुटूंब कल्याण कार्यक्रमा अंतर्गत मागासवर्गीय महिलांना कुटूंब कल्याण शस्त्रक्रियेसाठ ी लाभार्थ्यांना ६००रू /- व खुला प्रवर्गातील लाभार्थ्यांना २५० /-रूपये तसेच पुरूष शस्त्राक्रियेसाठी रूपये १४५१ रूपये दिले जातात.

३. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (टोल फ्री क्र १०२)

माता व बाल मृत्यु दर कमी करण्यासाठी माता व बालकांना विहीज वेळेत उपचार मिळणे अनुषंगाने केंद्र सरकारणे जजनी शिशु सुरक्षा कार्यक्रम जाहीर केला आहे. या योजनेमध्ये गरोदर मातांना नोंदणी ,तपासणी,औषधोपचार ,बळांतपण या सर्व सेवा मोफत पुरविणे . यामध्ये प्रयोगशाळा तपासण्या ,सिझेरियन सेक्शन ,रक्त संक्रमण या बाबीचाही समावेश आहे. तसेच नवजात अर्भकांना ० ते १ वर्षा पर्यंत उपचारासाठी दाखल झाल्यास नोंदणी ,तपासणी व औषधउपचार या सेवा मोफत पुरविणे .

४.आशा कार्यक्रम

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा यशस्वीरित्या पुरविण्याच्या उद्येशाने आशा कार्यक्रम अंतर्गत बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये १००० लोकसंख्येमागे १ आशा कार्यकर्ती व आदिवासी क्षेत्रामध्ये लोकसंख्येची अट नसुन प्रत्येक गावामध्ये १ आशा कार्यकर्तीची निवड करण्यात येते. आशा कर्मचारी यांना तिने केलेल्या कामानुसार मोबदला किंवा आर्थिक लाभ दिला जातो.

५. राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रम:-

या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील सर्व बालकांना त्यांच्या वयाप्रमाणे लसीकरण करण्यात येते यात **BCG, OPV, HepatitisB, Rotavlrus, Penta Vaccination, TT, Diphtheria , PCV,Vaccination** गोवर व रूबेला विरुध्दची लस इत्यादी लस देण्यात येतात ज्यामुळे या रोगजंतुमूळे होणारे बालमृत्यु टाळण्यास मदत होते.

| | | |
|---|---|---|
| २६ | सांख्यिकी अन्वेषक | १ |
| २७ | सार्वजनिक आरोग्य परिचारीका | ३ |
| २८ | वरिष्ठ सहाय्यक लेखा | १ |
| २९ | वरिष्ठ सहाय्यक | ४ |
| ३० | कनिष्ठ सहाय्यक लेखा | १ |
| ३१ | कनिष्ठ सहाय्यक | ८ |
| ३२ | वाहन चालक | ४ |
| ३३ | परिचर | ११ |

**राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत जिल्हात एकुण १२८५ पदे विविध संवर्गाची मंजुर आहेत**

**प्राथमिक आरोग्य केंद्र**

प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत बाहयरुग्ण सेवा ही ४ तास सकाळी व २ तास संध्याकाळी . २४ तास तातडीची सेवा पुरविण्यात येते. प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या मुलभूत सेवा

१. प्राथमिक उपचार प्रतिबंधात्मक सेवा
२. उपचारात्मक काळजी व संदर्भ सेवा
३. प्रजनन व बाल आरोग्य सेवा
४. आरोग्य व आहार विषयक शिक्षण
५. पाण्याचे गुणवत्तेचे सनियंत्रण आणि मुलभूत स्वच्छतेसाठी मार्गदर्शन
६. स्थानिक पातळीवर अस्तित्वात असलेल्या रोगांचे प्रतिबंध व नियंत्रण कार्य
७. जीवन विषयक आकडेवारी एकत्रीकरण व अहवाल सादरीकरण
८. विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविणे
९. शालेय आरोग्य तपासणी /अंगणवाडी तपासणी
१०. प्रशिक्षण
११. प्रयोगशाळेतील प्राथमिक (मुलभूत) तपासण्या.
१२. साथरोग नियंत्रण
१३. लसिकरण

**१.जननी सुरक्षा योजना**

जननी सुरक्षा योजने अंतर्गतअनुसूचित जाती अनुसूचित जमाती व दारिद्र रेषेखालील गरोदर महिला (वयाची व खेपेची अट नाही) यांना २. शासकिय /मान्यताप्राप्त खाजगी आरोग्य संस्थेत बाळंतपण केल्यास ग्रामीण भागातील महिलेस रू ७००/- व शहरी भागातील महिलेस रू ६००/- , बी.बी.एल.कुटूंबातील घरी प्रसुती झालेल्या महिलेस ५००/- अनुदान वितरीत करण्यात येत. मान्यताप्राप्त खाजगी रूग्णालयात सिझेरिअन झाल्यास १५००/- रू अनुदान दिले जाते. जननी सुरक्षा योजनेअंतर्गत प्रा.आ.केंद्र व उप केंद्र स्तरावर तसेच खाजगी मानांकित रूग्णालयामध्ये बाळंतपणाच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे प्रसुती सेवा उपलब्ध असलेल्या खाजगी प्रसुती गृहाची जिल्हा आरोग्य सोसायटी मार्फत तपासणी करून अशा संस्थांना मानांकन प्रमाणपत्र व जननी सुरक्षा योजनेबद्यलचे फलक वितरीत करण्यात आले आहे.

६. सिकलसेल कार्यक्रम

सिकलसेल या आजारग्रस्त असलेल्या रूग्णाना शोधुन समाजात सिकलसेल आजार पसरणार नाही या बाबत जनजागृती करणे

## आस्थापना विषयक

१) म.जि.प.व पं.स. अधिनियम १९६१ नुसार
२) महाराष्ट्र जिल्हा परिषद, वेतन व सेवा निवृत्ती आणि सुधारित रजा नियम १९८१ नुसार
३) महाराष्ट्र जिल्हा परिषद, शिस्त व अपील नियम १९६४ नुसार.
४) विषयानुसार / प्रकरणानुसार शासनाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार .
५)महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७.
६) साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

वरिल अधिनियम व शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार आरोग्य विभागातील कार्यरत कर्मचा-याचे सर्व आस्थापना विषक बाबी विहीत कालावधित पार पाडण्यात येतात त्यामध्ये नियुक्ती, पदोन्नती, बदली, वेतन वाढ , रजा प्रकरणे, शास्तीची कार्यवाही , निलंबन, आश्वासित प्रगती योजनेचा लाभ, रजा प्रवास सवलत, निवृत्ती वेतन, कुंटूंब निवृत्ती वेतन , गट विमा मंजुरी आदेश भविष्य निर्वाह निधी , सन अग्रीम , प्रशिक्षणास पाठविणे , अर्जित रजा रोखीकरण व घर बांधणी अग्रीम इत्यादी

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमाखाली प्राधान्य करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करणे बाबत वित्तीय अधिकारी नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग १ व २ नियमानुसार खर्च केला जातो.

(डॉ.संगिता देशमुख)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड